स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांकरिता मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने एकत्रित आदेश

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र. ०३ /का-८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १६ जुलै, २०२५.

**संदर्भ:-** राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.३/का.८,दि.३० जानेवारी,२०२३ चे आदेश व समक्रमांकाचे दि. २२ डिसेंबर, २०२३ चे शुध्दीपत्रक.

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व या निवडणुकांचे आयोजन करण्यासाठी अधीक्षण, संचलन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १९(ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ७-अ, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महा. ५) च्या कलम १३, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १२ अन्वये, राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी (लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या तरतुदींन्वये तयार केलेली) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता संबंधित प्रभागांमध्ये विभागून व अधिप्रमाणित करुन वापरण्याबाबत तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी संबंधित प्रभागामध्ये विभागून वापरण्यात येते, असे करीत असताना सदर मतदार यादीमध्ये मूळ विधानसभा मतदार यादीत नसलेली कोणतीही नवीन नावे समाविष्ट करण्याचे अथवा मूळ विधानसभा मतदार यादीत असलेली नावे वगळण्याचे; तसेच त्यामध्ये कोणत्याही दुरुस्त्या करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास किंवा राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीकरिता प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास नाहीत.

आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्यासाठी मतदार यादीत मतदारांची नावे योग्य त्या प्रभागात समाविष्ट करताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्याकरिता योग्य त्या कार्यपद्धतीचा अवलंब करुन मतदार यादी निर्दोष करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महा. ५) च्या कलम ९ए (४), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०ए (४) अनुसार संदर्भाधीन दिनांक ३०/०१/२०२३ चे आदेश व दिनांक २२ डिसेंबर, २०२३ चे शुध्दीपत्रक याद्वारे अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

## आदेश

१. विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरणे

राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास त्या-त्या भागासाठी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संबंधित प्रभागांमध्ये विभागून ती निवडणुकीसाठी छापून घेणे व प्राधिकृत अधिकाऱ्यांनी अधिप्रमाणित करणे आवश्यक आहे. असे करताना संबंधित क्षेत्राची विधानसभेची मतदार यादी जशी असेल तशी संबंधित प्रभागांमध्ये विभागावयाची आहे. त्यामध्ये कोणतीही नावे समाविष्ट करणे, कमी करणे किंवा त्यामध्ये सुधारणा करणे इत्यादींची अनुमती देण्यात आलेली नाही. मतदार यादी विभागतांना प्रभागाच्या हद्दीवर राहणाऱ्या मतदारांच्या संदर्भात विशेष दक्षता घेणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यकतेनूसार स्थळ निरीक्षण करावे. जेणेकरुन एका प्रभागाच्या हद्दीतील मतदारांची नावे अन्य प्रभागाच्या मतदार यादीत समाविष्ट होणार नाहीत. यासोबतच विधानसभा मतदार यादीमध्ये नमूद असलेले कोणतेही मतदार वगळले जाणार नाहीत तसेच यथास्थिती विधानसभा मतदार संघ, स्थानिक स्वराज्य संस्था, संबंधित प्रभागाच्या क्षेत्राबाहेरील मतदार चुकीने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार यादीत समाविष्ट होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

## २. मतदार यादीचे विभाजन करताना घ्यावयाची दक्षता

स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीची मतदार यादी प्रभागनिहाय विभाजित करताना विधानसभेच्या मतदार यादीतील सेक्शन ॲड्रेसचा वापर केला जातो. मात्र बऱ्याचदा सेक्शन ॲड्रेस हे मोघम, अपूर्ण किंवा चुकीचे असल्यास, एखादी इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था ही सेक्शन ॲड्रेसनुसार ज्या प्रभागात समाविष्ट दिसते, प्रत्यक्षात मात्र सदर इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था त्या प्रभागात नसून इतर प्रभागाच्या भौगोलिक हद्दीत असते. त्यामुळे सदर इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेतील रहिवाशी मतदारांची नावे ही मूळ प्रभागाऐवजी अन्य प्रभागात समाविष्ट होतात. सदर परिस्थिती ही विशेषत: लगतच्या प्रभागांच्या सीमांवर आढळते. अशावेळी केवळ सेक्शन ॲड्रेस लक्षात न घेता, सदर इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्थेतील मतदारांची नावे ही ती इमारत किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था प्रत्यक्षात ज्या प्रभागात स्थित आहे, त्याच प्रभागात समाविष्ट करणे बाबत काळजी घेण्यात यावी.

## ३. मतदार यादी अधिप्रमाणित करणे व त्याची अभिरक्षा

स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय मतदार यादींचे विभाजन करुन मतदार यादी अधिप्रमाणित करुन त्याची अभिरक्षा करण्याची जबाबदारी खाली नमूद अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

| अ. क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | मतदार यादी तयार करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी | | |
|---|---|---|---|---|
| | | मतदार यादीचे विभाजन करणे | मतदार यादी अधिप्रमाणित करुन अंतिमरित्या प्रसिध्द करणे | मतदार यादी सुरक्षितरित्या ताब्यात ठेवणे |
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका | महानगरपालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केलेला उपायुक्त दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी | महानगरपालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केलेला उपायुक्त दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी | महानगरपालिका आयुक्त यांनी प्राधिकृत केलेला सहायक आयुक्त दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी |
| २ | इतर महानगरपालिका | | | |
| ३ | नगरपालिका/ नगरपंचायत | मुख्याधिकारी | मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४ | जिल्हापरिषद/ पंचायत समिती | जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला तहसिलदार दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी | जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला तहसिलदार दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी | जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला तहसिलदार दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी |
| ५ | ग्रामपंचायत | जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला तहसिलदार दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी | जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला तहसिलदार दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी | जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला तहसिलदार दर्जापेक्षा कमी नाही असा अधिकारी |

४. प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करणे

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या मतदार यादी कार्यक्रमानुसार नेमून दिलेल्या दिनांकास प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करुन त्यावर हरकती व सूचना मागविण्यात याव्यात. अधिकाधिक मतदारांना मतदार यादीची प्रसिद्धीची माहिती होण्याकरिता राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिल्यानूसार तसेच उपलब्ध अन्य मार्गाने मतदार यादी प्रसिध्द करावी. आवश्यक असल्यास मतदार जागृती मोहिम राबविण्यात यावी.

५. दुबार नावांबाबत

विधानसभेच्या मतदार यादीतून दुबार नावे वगळण्याची कार्यवाही संबंधित मतदार नोंदणी अधिकारी मार्फत करण्यात येत असून, आता दुबार नावें मतदार यादीत राहण्याची शक्यता फार कमी आहे. तरी देखील अपवादात्मक परिस्थितीत प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करताना, जर काही मतदारांची नावे एकापेक्षा जास्त वेळा आली असल्याचे कळाल्यास व प्राथमिक चौकशी नंतर ती दुबार नावे एकाच व्यक्तीची असल्याचे निदर्शनास आल्यास तो मतदार एकच आहे याची खात्री करुन घ्यावी. जर त्या मतदाराचे नाव एकापेक्षा जास्त प्रभागात आले असल्यास अशा मतदारांची नावांची यादी सूचना फलकावर/वेबसाईटवर प्रसिध्द करावी व त्यांना ते कोणत्या प्रभागात मतदान करणार आहेत याबाबत लेखी अर्ज करण्याचे आवाहन करावे. जे मतदार सदर आवाहनाला प्रतिसाद देऊन ते कोणत्या प्रभागात मतदान करणार आहेत हे कळवतील, त्यानुसार अंतिम मतदार यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादीमध्ये नोंद घ्यावी. मात्र सदर आवाहनास अशा मतदारांनी प्रतिसाद न दिल्यास सर्व मतदार यादीमधील त्यांचे नांवासमोर “दुबार नांव” अशी नोंद करावी व असे मतदार मतदानासाठी आल्यास मतदान केंद्राध्यक्षांमार्फत त्यांच्या ओळखपत्रावरुन त्यांच्या खरेपणाविषयी खातरजमा करावी. अशी खात्री पटल्यानंतरच त्यांना मतदान करु द्यावे.

६. मतदार यादीवर हरकती/आक्षेप/सूचना नोंदविणे

मतदार यादीवर साधारणतः दोन प्रकारच्या हरकती/आक्षेप/सूचना प्राप्त होण्याची शक्यता आहे

(i) स्वतः मतदाराने केलेले अर्ज, आणि

(ii) इतर मतदाराने एक किंवा अनेक विशिष्ट मतदाराबाबत हरकत/आक्षेप घेणे.

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार विहित केलेल्या कालावधीमध्ये खालील नमूद बाबींच्या अनुषंगाने हरकती व सुचना नोंदविता येतील.

अ) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संबंधित क्षेत्रातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रभागानिहाय मतदार यादीमध्ये

(१) कोणत्याही प्रभागात नावे समाविष्ट करण्यात आली नसल्यास, किंवा

(२) चुकीच्या प्रभागात नावे समाविष्ट करण्यात आली असल्यास,

अशा मतदारांची नावे अनुक्रमे मतदार यादीत व योग्य प्रभागात समाविष्ट करणे, अशी परिस्थिती असल्यास, मतदाराने स्वत: विहित मुदतीत, वास्तव्याच्या पुराव्यासह सोबतच्या नमुना "अ" मध्ये अर्ज दाखल करणे आवश्यक राहील.

एकाच सहकारी गृहनिर्माण संस्थेत राहणाऱ्या एकापेक्षा अधिक मतदारांचे सोबतच्या नमुना "अ" मधील अर्ज त्या संस्थेच्या अध्यक्ष/सचिव यांच्यामार्फत, त्या संस्थेच्या लेटर हेड वर, संबंधित सचिव किंवा अध्यक्षाच्या स्वाक्षरीने एकत्रितपणे सादर करता येतील.

**कोणत्याही परिस्थितीत एक गठ्ठा पध्दतीने किंवा एकत्रित यादींच्या स्वरुपात हरकती दाखल करता येणार नाहीत व असे अर्ज विचारात घेणे आवश्यक असणार नाहीत.**

आ) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संबंधित क्षेत्रातील विधानसभा मतदार यादीत किंवा याद्यात नावे नसूनही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रभागानिहाय मतदार यादीमध्ये समाविष्ट करण्यात आली असल्यास, अशा मतदारांची नावे वगळणे, अशी परिस्थिती असल्यास, विहित मुदतीत तक्रारदाराने स्वत: नमुना "ब" मध्ये अर्ज सादर करणे आवश्यक राहील. **मात्र सदर तक्रारदार हा संबंधित प्रभागातील मतदार असावा.**

इ) लेखनिकांच्या चुका ( नाव,लिंग, चुकीचे टंकलेखन ई.) याबाबत मतदाराने विहीत नमुन्यातील (नमुना "अ") अर्जासोबत राज्य निवडणूक आयोगाने मतदाराची ओळख पटविण्यासाठी विहीत केलेल्या व मतदाराचे स्वत:चे छायाचित्र असलेल्या ओळखपत्रांपैकी कोणतेही एक ओळखपत्र (ज्यामध्ये मतदाराचे नांव योग्यरित्या नमूद केलेले आहे) सादर करणे आवश्यक असेल.

७. प्रारुप मतदार यादीसंदर्भात प्राप्त हरकती व सूचनांवर निर्णय घेणे

मतदाराने स्वतः अर्ज करुन परिच्छेद ६ (अ) नुसार मतदार यादीत दुरुस्ती करण्याची विनंती केल्यास, सदर अर्जाबाबत आवश्यक ती चौकशी व स्थळ पाहणी करुन योग्य निर्णय घेण्यात यावा.

मात्र कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीने एक किंवा अनेक मतदारांबाबत नमुना "ब" मध्ये हरकत/आक्षेप सादर केल्यास, ज्या मतदाराबाबत हरकत/आक्षेप घेण्यात आले आहे त्या मतदाराला नोटीस काढून त्याचे म्हणणे मांडण्यासाठी वाजवी संधी दिल्याशिवाय हरकत/आक्षेप अर्जावर निर्णय घेण्यात येऊ नये.

**उपरोक्त कार्यवाही करतांना, आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस ज्या मतदाराचे अथवा मतदारांची नावे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राशी संबंधित विधानसभा मतदार यादीत नसतील, अशा मतदारांची नावे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार यादीत समाविष्ट करता येणार नाहीत.**

लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार विधानसभा मतदार यादीमध्ये बदल करावयाचा असल्यास मतदाराने संबंधित विधानसभा क्षेत्रासाठी नियुक्त मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक राहील.

८. अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर त्यात दुरुस्ती

स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर कोणतेही अर्ज/आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच अंतिम मतदार यादीत साधारणतः कोणत्याही कारणास्तव दुरुस्ती करता येणार नाही. मात्र अपवादात्मक परिस्थितीत विधानसभा मतदार यादीवरुन जिल्हा परिषद निवडणूक विभाग, पंचायत समिती निर्वाचक गण, महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती आणि ग्रामपंचायत निवडणुकांसाठी विधानसभा मतदार यादी प्रभागनिहाय विभागून अंतिमरित्या प्रसिद्ध केल्यानंतर काही मतदारांची नावे, राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस संबंधित क्षेत्राच्या विधानसभा मतदार यादीत असून देखील, ती नावे यथास्थिती जिल्हा परिषद निवडणूक विभाग, पंचायत समिती निर्वाचक गण, महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपंचायती आणि ग्रामपंचायत निवडणुकीच्या प्रभागनिहाय मतदार यादीत छापायचे राहून

गेल्यास किंवा ज्या निवडणूक विभागात, निर्वाचक गणात किंवा प्रभागात असणे आवश्यक आहे, त्याऐवजी दुसऱ्या विभागात, गणात किंवा प्रभागात चुकीने छापण्यात आले असल्याबाबत, मतदार यादी तयार करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या निदर्शनास आल्यास, संबंधित प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने त्याची खात्री करुन आणि सकारण आदेश (speaking order) पारित करुन त्याबाबत योग्य त्या दुरुस्त्या पुरवणी यादीच्या स्वरुपात कराव्यात. मात्र अशा दुरुस्त्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीसाठी नामनिर्देशन पत्रे भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंतच करता येतील. या पुरवणी यादीला व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी व ती संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वेबसाईटवर देखील प्रसिध्द करावी.

सदर आदेश राज्यातील सर्व ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी लागू राहतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

२८.०५.२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति – १) विभागीय आयुक्त (सर्व)
२) जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)
३) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
४) मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपंचायती (सर्व)
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
६) निवड नस्ती.

# नमुना-अ

## मतदारांसाठी

*(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०३/का-८, दि.१६/०७/२०२५ सोबतचे)*

*----------------- (स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव) सार्वत्रिक/पोटनिवडणूक सन ----------*

प्रति,
प्राधिकृत अधिकारी (मतदार यादी)
प्रभाग क्रमांक -----------------
------------------- (स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव)

मतदाराचे नाव: --------------------
संपूर्ण पत्ता: --------------------
संपर्क क्रमांक/मोबाईल क्रमांक: --------------------

**( खालील पैकी लागू नसेल ते खोडावे.)**

अ. मी विनंती करतो/करते की,खाली नमूद केल्यानुसार माझे नाव विधानसभा मतदार यादीत असून देखील कोणत्याही प्रभागात समाविष्ट करण्यात आलेले नाही. तरी, सोबत जोडलेले रहिवासाचे पुरावे तपासून माझे नाव **योग्य त्या प्रभागात कृपया समाविष्ट करावे.**

ब. मी विनंती करतो/करते की,खाली नमूद केल्यानुसार माझे नाव **चुकीच्या प्रभागात समाविष्ट केले असून ते प्रभाग क्र. ______ मध्ये समाविष्ट करावे.**

क. मी विनंती करतो/करते की,खाली नमूद केल्यानुसार माझे नाव विधानसभा मतदार यादीत **नसून देखील प्रभागनिहाय मतदार यादीमध्ये समाविष्ट केले आहे. तरी, ते वगळण्यात यावे.**

ड. मी विनंती करतो/करते की,खाली नमूद केल्यानुसार माझे नाव विधानसभा मतदार यादीत असून लेखनिकांच्या चुकांमुळे ( नाव,लिंग, चुकीचे टंकलेखन ई.) ते चुकीचे छापण्यात आलेले आहे. तरी ते दुरुस्त करुन छापण्यात यावे.

| | |
|---|---|
| नाव व पत्ता | |
| विधानसभा क्र./ यादीभाग क्र. व अनुक्रमांक | |
| प्रारूप मतदार यादीमध्ये नाव असल्यास प्रभाग क्रमांक (नाव नसल्यास "नाही"असे नमूद करावे.) | |
| प्रारूप मतदार यादीच्या प्रभागातील अनुक्रमांक | |
| ज्या प्रभागात नाव समाविष्ट होणे अपेक्षित आहे, तो प्रभाग क्रमांक | |
| रहिवासाबाबत जोडलेल्या पुराव्याचे नाव<br>(आधार कार्ड,मतदार ओळखपत्र तसेच राज्य निवडणूक आयोगाने मतदाराची ओळख पटण्यासाठी दिलेले अन्य पुरावे इ.) | |

दिनांक :
ठिकाण :

मतदाराची स्वाक्षरी

(नाव-----------------)

टिप:-
१) अपवादात्मक परिस्थितीत मतदार स्वत: अर्ज सादर करू शकत नसल्यास-
सदर अर्ज सादर करणाऱ्या व्यक्तीचे नाव:-------------------- मोबाईल क्र. ----------------
२) जोडलेल्या पुराव्यांची संख्या व तपशिल :-----------

# नमुना-ब
## तक्रारदारांसाठी

*(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०३/का-८, दि.१६/०७/२०२५ सोबतचे)*

*------------------------ (स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव) सार्वत्रिक/पोटनिवडणूक सन --------*

प्रति,
प्राधिकृत अधिकारी (मतदार यादी)
प्रभाग क्रमांक ------------------
------------------- (स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव)

तक्रारदाराचे नाव: ----------------------
प्रभाग क्रमांक व मतदार यादीतील अ.क्र. ----------------------
संपूर्ण पत्ता: ----------------------
संपर्क क्रमांक/मोबाईल क्रमांक: ----------------------

( खालील पैकी लागू नसेल ते खोडावे.)

अ. मी विनंती करतो/करते की,खाली नमूद केल्यानुसार संबंधित मतदाराचे नाव विधानसभा मतदार यादीत असून देखील संबंधित मतदाराचे नाव चुकीच्या प्रभागात समाविष्ट केले आहे.

तरी सोबत जोडलेले रहिवासाचे पुरावे तपासून सदर मतदाराचे नाव योग्य त्या प्रभागात कृपया समाविष्ट करावे.

| | |
|---|---|
| ज्या मतदाराबाबत तक्रार द्यावयाची आहे त्या मतदाराचे नाव व पत्ता | |
| त्या मतदाराचा विधानसभा क्र./ यादीभाग क्र. व अनुक्रमांक | |
| त्या मतदाराचे प्रारूप मतदार यादीमध्ये नाव असल्यास प्रभाग क्रमांक व अनुक्रमांक (नसल्यास "नाही"असे नमूद करावे.) | |
| त्या मतदाराचे ज्या प्रभागात नाव समाविष्ट होणे अपेक्षित आहे, तो प्रभाग क्रमांक | |
| रहिवासाबाबत जोडलेल्या पुराव्याचे नाव (आधार कार्ड, मतदार ओळखपत्र तसेच राज्य निवडणूक आयोगाने मतदाराची ओळख पटण्यासाठी दिलेले अन्य पुरावे इ.) | |

2

ब. खाली नमूद केल्यानुसार मी विनंती करतो/करते की,खाली नमूद केल्यानुसार संबंधित मतदाराचे नाव विधानसभा मतदार यादीत **नसून देखील प्रभागनिहाय मतदार यादीमध्ये समाविष्ट केले आहे. तरी, ते वगळण्यात यावे.**

| | |
|---|---|
| ज्या मतदाराबाबत तक्रार द्यावयाची आहे त्या मतदाराचे नाव व पत्ता | |
| त्या मतदाराचा विधानसभा क्र./ यादीभाग क्र. व अनुक्रमांक | |
| त्या मतदाराचे नाव प्रारूप मतदार यादीमध्ये समाविष्ट केलेले प्रभाग क्रमांक व अनुक्रमांक | |
| त्या मतदाराच्या रहिवासाबाबत जोडलेल्या पुराव्याचे नाव (आधार कार्ड,मतदार ओळखपत्र तसेच राज्य निवडणूक आयोगाने मतदाराची ओळख पटण्यासाठी दिलेले अन्य पुरावे इ.) | |

दिनांक :

ठिकाण :

तक्रारदाराची स्वाक्षरी

(नाव-----------------)

टिप:-

१. तक्रारदाराने एखाद्या मतदाराचे नाव वगळण्यासाठी दाखल केलेल्या तक्रार अर्जासोबत ज्या विधानसभा मतदार यादीमध्ये संबंधित मतदाराचे नाव समाविष्ट आहे त्याच्या यादीभाग क्रमांकाची प्रत जोडावी.

२. तक्रारीच्या पुष्ठार्थ पुरावे जोडणे आवश्यक असून जोडलेल्या पुराव्याचे नाव ----------------- व जोडलेल्या पुराव्यांची संख्या:-----------